## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-३०३/२०२३

**अपिलार्थी, श्री.कल्पेश गंगाराम जोशी,**
**रामदास म्हात्रे, घर क्रमांक १३४९,**
**वडोलगाव, कल्याण बदलापूर रोड,**
**अंबरनाथ (प), जि.ठाणे ४२१ ५०१.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक प्रशासन,
अंबरनाथ पोलीस ठाणे, अंबरनाथ (प),
जि.ठाणे ४२१ ५०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक,
अंबरनाथ पोलीस ठाणे, अंबरनाथ (प),
जि.ठाणे ४२१ ५०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : २१.४.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.९.२०२२ | २०.१०.२०२२ | ७.११.२०२२ | २९.११.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि.१.२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर असमाधानकारक आहे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.मनिष वाघमारे, पोलीस उप निरिक्षक, अंबरनाथ पोलीस ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(आपल्या कार्यक्षेत्र अंतर्गत असलेल्या अंबरनाथ पश्चिम पोलीस स्टेशन मधील सर्व कॅमेरा चित्रीकरण (CCTV Footage) बाबत माहिती मिळणेबाबत.) "*

*आपल्या कार्यक्षेत्र अंतर्गत असलेल्या अंबरनाथ पश्चिम पोलीस स्टेशन मधील सर्व कॅमे-याचे CCTV Footage मिळणेबाबत विनंती आहे. सदरचे चित्रीकरण हे आपण मला pendrive मध्ये किंवा CD मध्ये जतन करून देण्यात यावे.)"*

तद्‌नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " समाधानकारक व योग्य माहिती मिळाली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, “अपिलार्थी यांना पुरविण्यासाठी सी.सी.टी.व्ही. फुटेज अभिलेखावर उपलब्ध नव्हते. ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली. त्यांचे समाधान झाले आहे.” असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना सदरची माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी ३ दिवसांच्या आतमध्ये पोलीस स्टेशनमध्ये सदरचे CCTV Footage जतन करून ठेवण्याची विनंती केली होती. परंतु, विलंबाने माहिती अर्ज केल्याच्या कारणास्तव त्यांना पुरविण्यात आली नाही.

अपिलार्थी यांनी पुढे असेही नमूद केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व पोलीस स्टेशनचे सी.सी.टी.व्ही. फुटेज १ वर्षापर्यंत जतन करून ठेवणे आवश्यक आहे. असे असताना अंबरनाथ पोलीस ठाणे यांनी सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज जतन केले नाही.

या संदर्भात खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, दि.२१.६.२०२२ ते दि.३०.६.२०२२ या कालवधीमध्ये त्यांच्या पोलीस स्टेशमध्ये १ वर्षाच्या कालावधीची जतन क्षमता असलेली यंत्रणा लावण्यात आली नव्हती. ती त्यानंतरच्या कालावधीत लावण्यात आली आहे. सबब, १ वर्ष जतन क्षमता असलेली सी.सी.टी.व्ही. कॅमेराची

प्रणाली अंबरनाथ पोलीस ठाणे यांच्या कार्यालयात कधी लावण्यात आली आहे त्याची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ